# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

**आस्थापना विभाग**

**एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५**

**फोन नंबर ०७१३२-२२३१०४**

जावक क्रमांक : गों.वि./आस्था/माहिती/ ६०४ /२०१६

दिनांक :०८/०३/२०१६

## परिपत्रक

विषय - केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत सन २०१५ चा (१ जानेवारी, २०१५ ते ३१ डिसेंबर २०१५) दहावा वार्षीक अहवाल सादर करणेबाबत.

संदर्भ :- १) मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्र. माअअ २०१५/प्र.क्र. २४८-१५/आस्था-२, दि. ३०/१२/२०१५ (प्राप्त दिनांक १३/०१/२०१६)

२) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयनी पत्र क्र. उशिनाग/स्टेनो/मा.अ./वार्षिक अहवाल/१५५/१५

३) कार्यालयीन परिपत्र क्र. गोंवि/आस्था/माहिती/१७१/२०१६, दि. २०/०१/२०१६

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने संलग्नित महाविद्यालयातील मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, विद्यापीठास संदर्भीय पत्र प्राप्त झाले असून सदर पत्रात नमुद केल्याप्रमाणे आपल्या महाविद्यालयाशी संबधीत माहिती संलग्नित विवरणपत्रामध्ये भरून व माहिती बरोबर असल्याचे प्रकरणपत्रासह अहवाल शासनास विहित मुदतीत सादर करण्यात यावे. तसेच त्याची प्रत मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे, मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर व विद्यापीठास तात्काळ देण्याबाबत संदर्भीय पत्र क्र. ३ नुसार कळविण्यात आले होते परंतु आजपावेतो काही महाविद्यालयाची माहिती अप्राप्त असून आपल्या स्तरावर माहिती तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावी .

करीता माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सादर.

(डॉ. विनायक इरपाते)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

११५

प्रतिलिपी :-

१) सर्व संलग्नित महाविद्यालय

E:\Right of information act under matter 2016\RTI-201/11

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

**आस्थापना विभाग**

**एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५**

**फोन नंबर ०७१३२-२२३१०४**


जावक क्रमांक : गों.वि./आस्था/माहिती/६०५ /२०१६ दिनांक : ०८/०३/२०१६

## परिपत्रक

**विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४ (१) चे अंमलबजावणी तसेच कार्यालयीन कामकाज नियमपुस्तिकेतील तरतुदींचे पालन करणेबाबत.**

संदर्भ :- १) मा. राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे कार्यालयीन पत्र क्र.रामाआ/माहिती कलम ४(१)/प्र.क्र. २६/२०१५/आस्था/१३४४, दि. १५/०२/२०१६(प्राप्त दि. १८/०२/२०१६)

२) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१५/प्र.क्र. २५२/२०१५/६, दिनांक २८/०१/२०१६

३) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१६/प्र.क्र. २९/१८ (र. व का.), दिनांक १०/०२/२०१६

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने संलग्नित महाविद्यालयातील मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, विद्यापीठास संदर्भीय पत्र क्र. १ प्राप्त झाले असून सदर पत्रात नमुद केल्याप्रमाणे आपल्या महाविद्यालयाशी संबधीत माहिती संदर्भीय पत्र क्र. २ च्या शासन निर्णयान्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ च्या तरतुदीसंदर्भात शासनाने जारी केलेल्या परिपत्रकातील तदतुदीचे पालन करण्याच्या दृष्टीने आपल्या कार्यालयातील दिनांक ०१ जानेवारी, व ०१ जुलै, रोजी असे वर्षातुन किमान दोन वेळा संकेतस्थळावरील (वेब साईट) माहिती अद्यावती करावी तसेच अधिकाऱ्यासंदर्भात काही माहिती जसे बदल्यांबाबतची माहिती वेळोवेळी अद्यावत केली जावी.

करीता माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सादर.

(डॉ. विनायक ईरपाते)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र :- संदर्भीय पत्र क्र. १ संलग्नित.

प्रतिलिपी :-

१) सर्व संलग्नित महाविद्यालय

E:\Right of information act under matter 2016\RTI-201/15

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ कार्यालय, नागपूर विभाग.

क्रमांक :- रामाआ/माहिती कलम ४(१)/प्र.क्र.२६/२०१५/आस्था/१३४४ दिनांक :- ११.०२.२०१६

.15 FEB 2016

**प्रति,**

जिल्हाधिकारी, नागपूर/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/भंडारा/गोंदिया.
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/भंडारा/गोंदिया.
आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर/चंद्रपूर
सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर.
कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषयः- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४ (१) चे अंमलबजावणी तसेच कार्यालयीन कामकाज नियमपुस्तिकेतील तरतूदींचे पालन करणेबाबत.**

**संदर्भ :-** १) या कार्यालयाचे समक्रमांकाचे दि. ०९.१०.२०१५ चे पत्र.
२) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१५/प्र.क्र. २५२/२०१५/६, दिनांक २८.०१.२०१६.
३) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१६/प्र.क्र. २९/१८(र.व का.), दिनांक १०.०२.२०१६.

**महोदय,**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ (१) बाबत नागपूर जिल्हयातील सार्वजनिक प्राधिकरणामध्ये अंमलबजावणी होत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून आयोगाकडे वेळोवेळी प्राप्त होत असल्याने संदर्भांकित क्रमांक १ च्या पत्रान्वये वरील सर्व प्राधिकरणास कलम ४ (१) ची माहितीच्या अमलबजावणीबाबत कळविण्यात आले होते.

२. संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयान्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ च्या तरतूदीसंदर्भात शासनाने जारी केलेल्या परिपत्रकातील तरतूदीचे पालन करण्याच्या दृष्टिने आपल्या अधिनस्त असलेल्या कार्यालयांना कळवून दिनांक ०१ जानेवारी, व ०१ जुलै, रोजी असे वर्षातून किमान दोन वेळा संकेतस्थळावरील (वेब साईट) माहिती अद्यावत करावी. मात्र अधिकाऱ्यासंदर्भात काही माहिती जसे बदल्यांबाबतची माहिती वेळोवेळी अद्यावत केली जावी.

३. संदर्भ क्रमांक ३ च्या परिपत्रकांन्वये पत्र लेखनाबाबत कार्यालयीन कामकाज नियम पुस्तिकेतील तरतूदीनुसार शासकीय पत्रे निर्गमित करतांना पत्रावर स्त्राक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याने स्वाक्षरीखाली कंसामध्ये नांव व त्याखाली पदनामाचा उल्लेख करणे आवश्यक असल्याचे परिपत्रकात नमूद केले आहे. त्यास अनुसरुन

मा. आयोगाकडे खुलासे तसेच अपीलाच्या संदर्भातील महत्त्वाची कागदपत्रे सादर करतांना संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कंसामध्ये स्वत:चे नाव व पदनाम नमूद करावे.

४. संदर्भांकित सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक २ व ३ वरील शासन परिपत्रकास अनुसरुन उपरोक्त नमूद केलेल्या बाबींसंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना कृपया द्याव्यात.

**आपला,**

**(मुकुंद प्र. देशपांडे)**
**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**